सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास विभाग**

**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

Website-https://mahaawaas.com

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९ Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/PMAY-G-२/२०२३/६६८ दिनांक -१९/०६/२०२३

**स्मरणपत्र-१**

प्रति,

प्रकल्प संचालक,

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व.

विषय : इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीतील लाभार्थ्यांना हप्ता वितरण करणेबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र./(PMAYG)/२०२३/६२८, दि.२९/०५/२०२३.

उपरोक्त विषयान्वये, दिनांक १८ व १९ मे २०२३ रोजी झालेल्या Performance Review Committee मिटींग मध्ये इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीमधील लाभार्थ्यांना हप्ता वितरण त्वरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या व ही योजना पूर्ण पणे बंद करण्यात आली असून सिंगल पेज एन्ट्री मध्ये लाभार्थ्यांना अनुदान वितरण करण्याची प्रक्रिया कोणत्याही क्षणी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार बंद करण्याची शक्यता येत नाही.

दिनांक २२ ते २६ मे २०२३ रोजी राज्य कक्षाने आयोजित केलेल्या विभाग स्तरावरील मोहीमेदरम्यान टीमने काही तालुक्यांना इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीच्या अनुषंगाने भेटी दिल्या. त्यावेळी लाभार्थ्यांना दिलेल्या भेटी दरम्यान बाबी आढळून आलेल्या बाबी व याबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ अन्वये कळविण्यात आले होते. व तसेच या कार्यालयास दिनांक ०७ जून, २०२३ पर्यंत अहवाल सादर करणेबाबत सदर पत्रामध्ये नमूद करण्यात आले होते.

परंतु, अहवाल अद्यापपर्यंत या कार्यालयास प्राप्त झालेला नसून, त्या अनुषंगाने कार्यवाही करून लवकरात लवकर अहवाल सादर करावा ही विनंती.

सोबत - वरिलप्रमाणे

**(नीलेश काळे)**

**उपसंचालक**

**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**

**महाराष्ट्र राज्य**

**प्रत :-** १. मा.प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व यांना माहितीस्तव.

३. मा.उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष — ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी - बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४/ टोल फ्री क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.com
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./ (PMAYG)/२०२३/ 628

दि: २९/०५/२०२३

प्रति,

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
(सर्व).

विषय :- इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीतील लाभार्थ्यांना हप्ता वितरण करणे बाबत.

संदर्भ :- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे कडील पत्र क्र. Do No.Q-१४०१६/०२/२०२२-AI(RD) दि.०४/०५/२०२३

उपरोक्त विषयान्वये दिनांक १८ व १९ मे २०२३ रोजी झालेल्या Performance Review Committee मिटींग मध्ये इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीमधील लाभार्थ्यांना हप्ता वितरण त्वरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. व ही योजना पूर्ण पणे बंद करण्यात आली असून सिंगल पेज एन्ट्री मध्ये लाभार्थ्यांना अनुदान वितरण करण्याची प्रक्रिया कोणत्याही क्षणी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार बंद करण्याची शक्यता नाकरता येत नाही. तसेच दिनांक २२ ते २६ मे २०२३ रोजी राज्य कक्षाने आयोजित केलेल्या विभाग स्तरावरील मोहीमेदरम्यान टीमने काही तालुक्यांना इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीच्या अनुषंगाने भेटी दिल्या. लाभार्थ्यांना दिलेल्या भेटी दरम्यान खालील बाबी आढळून आल्या.

१) सिंगल पेज एन्ट्रीतील लाभार्थ्यांचे नाव ग्रामपंचायतीला माहित नाही.
२) बऱ्याच लाभार्थ्यांना सिंगल पेज एन्ट्री मध्ये त्यांचे नाव आहे हे देखिल माहित नाही.
३) लाभार्थ्यांचा तालुकास्तरावर किंवा जिल्हा स्तरावरुन संपर्क केलेला दिसून आला नाही.
४) लाभार्थ्यांनी मागणी करुन सुध्दा दुर्लक्ष केलेले दिसून आले.

या सर्व बाबींमुळे इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्री तील लाभार्थ्यांना अंतिम हप्ता देणे बाकी आहे. तरी या संदर्भात

**टप्पा १**- आपल्या जिल्हयामध्ये दिनांक ३१ मे २०२३ ते दिनांक २ जुन २०२३ या कालावधीमध्ये इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीतील लाभार्थ्यांची माहिती गृह भेटी द्वारे सोबत दिलेल्या प्रपत्रात संकलीत करावी.

**टप्पा २**- दिनांक ५ व ६ जुन २०२३ रोजी गृह भेटी द्वारे संकलीत झालेल्या माहितीच्या आधारे इंदिरा आवास योजना सिंगल पेज एन्ट्रीतील पात्र लाभार्थ्यांना अंतिम हप्ता देण्याची कार्यवाही पूर्ण करावी. (यामध्ये तांत्रिक अडचणी असल्यास तशी माहिती नमुद करावी.)

या दोन्ही टप्प्यांच्या अहवाल दिनांक ७ जुन २०२३ रोजी सर्व जिल्हयांनी राज्य कक्षास सादर करावा, अशा सूचना मा. संचालक यांनी दिलेल्या आहेत.

तरी वरील प्रमाणे विहीत वेळेत कार्यवाही करुन अहवाल सादर करावा ही विनंती.

सोबत – प्रपत्र.

(नीलेश काळे )
उपसंचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

प्रत :

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) यांना माहितीस्तव सादर.
३. उपायुक्त (विकास), विभागीय विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रपत्र

| अ.क्र. | लाभार्थी ID | लाभार्थ्यांचे नाव | मंजूर वर्ष | एकूण देय रक्कम | सद्यस्थिती | अंतिम हप्ता दिला नसल्याचे कारण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |